आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय  बातमीपत्र -दुपारी १.३०वाजता
२९ मे २०२५ -गुरुवार

- **<u>ठळक बातम्या</u>**
- ईशान्येकडचा संपूर्ण प्रदेश भारताच्या प्रगतीचा तेजस्वी अध्याय म्हणून उदयाला येत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन, प्रधानमंत्र्यांच्या हस्ते सिक्कीममधल्या विविध विकासकामांचं उद्घाटन

- मेक इन इंडिया हे निर्णायक धोरण असून त्यामुळे भारत भविष्यातल्या तंत्रज्ञानाचं विकास केंद्र बनू शकतो, असा संरक्षण मंत्र्यांचा विश्वास

- अमेरिकन नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधनं लादणाऱ्या काही परदेशी अधिकाऱ्यांवर अमेरिका व्हिसाबाबतचे नवे निर्बंध लागू करणार

**आणि**

- महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागात आजही जोरदार पावसाचा हवामान विभागाचा इशारा

**<><><><><>**

सिक्कीम सह ईशान्येकडचा संपूर्ण प्रदेश भारताच्या प्रगतीचा तेजस्वी अध्याय म्हणून उदयाला येत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज सिक्कीम मधल्या विविध विकास कामांचं दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उद्घाटन करताना बोलत होते.

देशाचं प्रत्येक राज्य आणि प्रदेशाचं स्वतःचं वैशिष्ट्य आहे, आणि म्हणूनच, केंद्र सरकारनं ईशान्येकडच्या प्रदेशाला विकासाच्या केंद्रस्थानी आणलं आहे. तसंच आपल्या 'अ◌ॅक्ट ईस्ट' धोरणावर, सरकार  'अ◌ॅक्ट फास्ट' दृष्टिकोनानं काम करत आहे, असं ते यावेळी म्हणाले. भारताला ‘विकसित’ बनवण्यासाठी प्रत्येक राज्य आणि प्रदेशाचा विकास आवश्यक असून, येत्या २५ वर्षांमध्ये सिक्कीमला जगाचं ग्रीन मॉडेल बनवण्याचं उद्दिष्ट ठेवायला हवं असं प्रधानमंत्री म्हणाले.

**-- होल्ड बाईट- प्रधानमंत्री --**

प्रधानमंत्री मोदी यांनी आज दूरस्थ पद्धतीनं सिक्कीम मधल्या विविध विकास कामांची पायाभरणी आणि उद्घाटन केलं. नामची जिल्ह्यात साडेसातशे कोटी रुपये खर्चाचं ५०० खाटांचं जिल्हा रुग्णालय, आणि सांगाचोलींग इथला रोप वे, या प्रकल्पांचा यात समावेश आहे.

प्रधानमंत्री आज दुपारी पश्चिम बंगालला भेट देणार आहेत. याठिकाणी ते अलीपुरद्वार आणि कूचबिहार या जिल्ह्यांमधल्या गॅस वितरण प्रकल्पाची पायाभरणी करतील. त्यानंतर संध्याकाळी ते बिहार इथं भेट देणार असून, पाटणा विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीचं उद्घाटन करतील. प्रधानमंत्री उद्या बिहारमध्ये कराकट इथं विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन, पायाभरणी आणि लोकार्पण करतील. त्यानंतर ते उत्तर प्रदेशला भेट देणार असून, कानपूर नगर इथं विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करतील.

**<><><><><>**

मेक इन इंडिया हे देशासाठी निर्णायक धोरण असून, जपान प्रमाणे, भारतही भविष्यातल्या तंत्रज्ञानाचं विकास केंद्र बनू शकतो, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं CII, अर्थात भारतीय उद्योग महासंघाच्या वार्षिक व्यवसाय परिषदेला संबोधित करत होते. देशाची सुरक्षा आणि समृद्धीसाठी ‘मेक इन इंडिया’ महत्वाचं असून ऑपरेशन सिंदूर दरम्यान देशवासीयांनी या मोहिमेचं यश अनुभवल्याचं ते यावेळी म्हणाले. भारत आज केवळ लढाऊ विमानं किंवा क्षेपणास्त्र प्रणाली बनवत नसून, नव्या युगाच्या युद्ध तंत्रज्ञानासाठी देखील सज्ज होत आहे असं त्यांनी सांगितलं.

भारतानं दहशतवादाविरोधातलं आपलं धोरण आणि प्रतिसाद नव्यानं परिभाषित केलं असून, पाकिस्तानला हे समजलं आहे की, दहशतवादाचा व्यवसाय चालवणं किफायतशीर नाही, कारण त्यासाठी मोठी किंमत मोजावी लागेल, असं ते म्हणाले.

संपूर्ण जगात आज अनिश्चिततेचं वातावरण असून, विश्वासाचा अभाव हे त्याचं मूळ कारण आहे. या पार्श्वभूमीवर, देशाचे विविध प्रदेश, समुदाय आणि आर्थिक घटकांमध्ये विश्वासाचं मजबूत वातावरण निर्माण करण्याचा भारताचा प्रयत्न असल्याचं राजनाथ सिंह यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज राष्ट्रपती भवनातल्या सांस्कृतिक केंद्रात आयोजित साहित्य संमेलनाचं उद्घाटन करतील. साहित्य अकादमीच्या सहयोगानं आयोजित केलेल्या या दोन दिवसीय कार्यक्रमात कवी संमेलन, भारतातलं स्त्रीवादी साहित्य, साहित्यातले बदलते प्रवाह विरुद्ध बदल परिभाषित करणारं साहित्य, जागतिक दृष्टिकोनातून भारतीय साहित्याच्या नव्या दिशा, या आणि इतर विषयांवर सत्र आयोजित केली जातील. देवी अहिल्याबाई होळकर यांची गाथा सादर करून या कार्यक्रमाची सांगता होईल.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरबाबत भारताची भूमिका मांडण्यासाठी सर्वपक्षीय खासदारांची सात शिष्टमंडळे वेगवेगळ्या देशांमध्ये उच्चस्तरीय बैठका घेत आहेत.

डीएमके खासदार के कन्निमोळी यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळाने काल ग्रीसचे परराष्ट्र उपमंत्री, परराष्ट्र मंत्रालयातले उच्चाधिकारी आणि महत्वाच्या व्यक्तींची भेट घेतली. दहशतवादी आणि त्यांना सहाय्य किंवा आश्रय देणारे यांच्यामध्ये फरक करता कामा नये ही भारताची भूमिका त्यांनी मांडली.

भाजपा खासदार रवीशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने रोममध्ये परराष्ट्र व्यवहार आणि संरक्षण समितीच्या अध्यक्षांची तसंच भारत इटली मैत्री समूहाच्या अध्यक्षांची भेट घेतली. भारत आणि इटली दोघांच्याही दहशतवादाविरोधात मतात साम्य आहे, असं रवीशंकर प्रसाद यांनी माध्यमाशी बोलताना सांगितलं.

संजयकुमार झा यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळाने इंडोनेशियातल्या शैक्षणिक क्षेत्रातल्या नेतृत्वाशी संवाद साधला आणि दहशतवाद विरोधातील भारताच्या शून्य सहनशक्ती धोरणाबाबात चर्चा केली. काँग्रेस खासदार शशी थरुर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पनामात भारतीय दूतावासाने आयोजित केलेल्या बैठकीत दहशतवाद विरोधात भारत कठोर धोरणांचा अवलंब करत असल्याचं अधोरेखीत केलं. यापुढेही जशास तसे उत्तर भारताकडून दिले जाईल असंही त्यांनी सांगितलं.

राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्नाखालील शिष्टमंडळ 27 तारखेपासून दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर आहे. या शिष्टमंडळाने दक्षिण आफ्रिकेच्या उपमंत्र्यांना भारताच्या भूमिकेविषयी माहिती दिली तसंच केपटाऊनमध्ये प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. भाजपा खासदार बैजयंत पांडा यांनी सौदी अरेबियाच्या परराष्ट्र राज्यमंत्र्यांची भेट

घेतली.  पहेलगाम हल्ल्याच्या वेळी सौदी अरेबियाच्या राजकीय नेतृत्वाने दिलेल्या पाठिंब्याबद्द्ल त्यांनी आभार मानले.

शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ  डेमॉक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगोमधील भेटीनंतर सिएरा लिऑन या देशात पोहचलं आहे.

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याला कारणीभूत असणाऱ्यांना चोख प्रत्युत्तर दिल्याबद्दल रशियाचे राजदूत देनिस अलिपॉव यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची प्रशंसा केली आहे. भारत आणि रशिया हे दोन्ही देश बहुपक्षीय जागतिक व्यवस्थेचे समर्थक असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन हे यावर्षी भारताला भेट देण्याची शक्यता आहे असं क्रेमलिननं म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकन नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधनं लादणाऱ्या काही परदेशी अधिकाऱ्यांवर अमेरिका व्हिसा बाबतचे नवे निर्बंध लागू करणार आहे. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी ही माहिती दिली. अमेरिकन नागरिकांनी त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा वापर केल्यावर या परदेशी अधिकाऱ्यांनी त्यांना दंड ठोठावला, तसंच त्यांचा छळ केल्याचं ते यावेळी म्हणाले. हे निर्बंध परदेशी अधिकारी आणि अमेरिकन नागरिकांच्या स्वातंत्र्यावर बंधनं लादण्यात सहभागी असलेल्यांसाठी लागू राहतील, असं त्यांनी समाज माध्यमावरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, विदर्भ, कर्नाटकचा किनारपट्टी भाग, केरळ, तामिळनाडू, पुडुचेरी, ओडिशा, तेलंगणा, पश्चिम बंगाल, उत्तराखंड, बिहार, छत्तीसगड, आंध्रप्रदेशचा  किनारपट्टी भाग, आणि झारखंडच्या काही भागात आज जोरदार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. तर देशाच्या ईशान्येकडेच्या प्रदेशात पुढले सात दिवस मध्यम ते जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

दरम्यान, पश्चिम राजस्थानमध्ये उद्या उष्णतेची लाट राहील आणि धुळीचं वादळ येईल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**<><><><><>**

सन २०२४-२५ मधे भारताचं अन्नधान्य उत्पादन ३५४ दशलक्ष टनापर्यंत पोहोचण्याचा अंदाज सरकारने वर्तवला आहे. हे उत्पादन २०२३-२४  पेक्षा ६ टक्क्याहून जास्त आहे. गहू, तांदूळ, मका, सोयाबीन, डाळी आणि शेंगदाणा या प्रमुख पिकांचा यात समावेश आहे. तांदूळ १ हजार ४९० लाख मेट्रिक टन, गहू १ हजार १५७ लाख मेट्रिक टन तसंच भरड धान्यामधे ५४ लाख मेट्रिक टनाची वाढ झाली आहे.

अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ होत आहे, मात्र डाळी आणि तेलबियांच्या उत्पादनाचा वेग वाढवण्याची गरज आहे, असं केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे. सरकारने  शेतमालाच्या  किमान आधारभूत किमतीत वाढ केली तसंच खत वेळेवर उपलब्ध करून दिलं, त्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ झाली असं चौहान म्हणाले.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय योग दिनाची तयारी संदर्भात काल नवी दिल्लीत विविध मंत्रालयांमध्ये एक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत महत्त्वाच्या मंत्रालयांमधील वरिष्ठ अधिकारी, आयुष संस्थेचे पदाधिकारी आणि इतर संबंधित उपस्थित होते. येत्या ११ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात येणार असून तो आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा करण्याच्या तयारी संदर्भात चर्चा करण्यात आल्याची माहिती आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितलं.

**<><><><><>**

लडाखमध्ये आज विकसित कृषी संकल्प अभियानाच्या बसला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. ही बस दोन आठवडे लडाख जिल्ह्यात फिरणार असून त्याद्वारे शेतकऱ्यांना खरीपपूर्व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या बसच्या माध्यमातून दरदिवशी दीडशे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार असून लडाखच्या २५ हजार शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार आहे. या बसच्या माध्यमातून संशोधक, तांत्रिक सल्लागार आणि वरिष्ठ अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत.

**//<><><><><>//**